पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १३८
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक :- २७.१०.२००९ वेळ :- दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक २७.१०.२००९ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.साळुंखे सुरेखा मारुती
५. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
८. मा.अशोक दशरथ सोनवणे
९. मा.जगदीश शंकर शेट्टी
१०. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
११. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
१२. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१३. मा.रामदास तानाजी कुंभार
१४. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख, मा.झुरे,मा.सावंत,मा.गायकवाड,मा.गावडे,मा.भोसेकर,मा.गायकवाड-सहा.आयुक्त, मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटिल-उप संचालक (नगररचना),मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.पाटिल,मा.बनकर,मा.थोरात,मा.चिंचवडे,मा.जाधव,मा.कुदळे,मा.निकम, मा.चव्हाण,मा.दुधेकर,मा.सवणे-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.) मा.हरिभारती-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.फुगे-मुख्य आयातकर अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले -</u>

विषय क्रमांक ३७) मा.महापौर कक्षासाठी चहा-कॉफी मेकर मशिन साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक ३८) JNNURM प्रकल्पातील पाणीपुरवठा व जलनि:सारणाचे कामांची निविदा नोटीस प्रसिद्धीसाठी आलेल्या खर्चास मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक ३९) पिं.चिं.मनपाच्या प्राथमिक शाळेतील मानधनावरील सफाई/ शिपाई कामगार यांचे मानधन वाढविणेबाबत- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) इंग्रिश स्पिकींग प्रशिक्षणाबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.सुरेखा साळुंखे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) विद्युत मुख्य कार्यालयाकडील सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.सुरेखा साळुंखे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२) जकात विभागाच्या कंपनी तपासणी कामकाजासाठी संगणक M.S. Office ज्ञान अवगत असलेले पदवीधर कर्मचारी ठेकेदारी पद्धतीने पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ४३) वॉर्ड क्र.५५ मधील आकुर्डी रेल्वे स्टेशन लगतचे उद्यान देखभालीसाठी मिळणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४) तरतूद रक्कम वर्ग करणेबाबत - मा.राजेश पिल्ले, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५) तानाजीनगर येथील सावित्रीबाई फुले उद्यान, तानाजी गावडे व्यायामशाळेजवळील आनंदीबाई डोके उद्यान व गणेशबाग उद्यान देखभालकामी देणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६) शासकिय वैद्यकीय अधिकारी पथकाचे निवासस्थानाचे बील अदा करणेबाबत - मा.राजेश पिल्ले, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७) कीटकनाशक फवारणी करणेबाबत - मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४८) क्रीडा मैदान, परीसर व हॉल देखभाल संरक्षणाकामी देणेबाबत - मा.राजेश पिल्ले, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४९) भोसरी जलतरण तलाव येथील फिल्ट्रेशन प्लॉन्ट दुरुस्ती करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत...

--------------

अ) दिनांक २९.९.२००९,०६.१०.२००९,१६.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०६.१०.२००९,१६.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक १४.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ड) दिनांक २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक :-९४७३ विषय क्रमांक :- १
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - प्रशासन
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१अ/कावि/४२६/०९ दि.२२/७/०९
२) मा.विधी समिती सभा दिनांक ११/८/२००९ ठराव क्र.११५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पाणीपुरवठा-जलशुद्धीकरण केंद्राचे कामकाज व कामाची निकड विचारात घेता पाणीपुरवठा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ७ संवर्गात ६५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यापैकी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६१ पदे पुर्वीचे मंजुर अर्हतेत तर उर्वरित ०४ पदे सोबतचे प्रपत्र अ मधील अर्हतेत निर्माण करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी मान्य करणेत यावी व त्याव्यतिरीक्त महापालिका आस्थापनेवरील गाळणी चालक व असि.गाळणी निरीक्षक या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान म्हणजेच र.रु.४०००-६००० अशी असून सदर पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती सोपान नसल्याने गाळणी निरीक्षक संवर्गातील एकुण पदांपैकी ७०% पदे सरळसेवेने तर ३०% पदे पदोन्नतीने भरण्यास व ३०% पदे पदोन्नतीने

भरण्याकरीता येणारी पदे प्रपत्र ब मधील अर्हतेनुसार भरण्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :-९४७४ विषय क्रमांक :- २
दिनांक - २७.१०.२००९ विभाग-मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/६७७/०९
दि.२०/०८/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-१९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-२६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू. १० कोटी मधून र.रू.५८,००,०००/- कपात करून तसेच अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-१) पान क्रमांक-१८ ते १९ मधील अ.क्र.५ वाहन खरेदी या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू.३,००,००,०००/- मधून र.रू.२५,००,०००/- कपात करून मनपाचे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-७६ ते ७९ मधील आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-१२ साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर एकूण र.रू.८३,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४७५ विषय क्रमांक :- ३
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झो.नि.पु./स्था/जा/कावि/५८९/०९
दि.१७/०८/२००९.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

झो.नि.पू.स्थापत्य या विभागाचे सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे १,९०,७७,०००/- एवढ्या रकमेचे वेगवेगळ्या विकास कामासाठी चे अंदाजपत्रक मंजुर झालेले असून सदर विभागाकडे सद्यःस्थितीतील चालू असलेली कामे, नव्याने सुरू करावयाची कामे तसेच प्रलंबित बिले अदा करण्यासाठी आवश्यक असणारी तरतूद इत्यादीचा विचार करता या विभागाकडे लेखाशिर्षनिहाय असणारी एकूण तरतूद व अंदाजपत्रकाची एकूण रक्कम या मध्ये कोणताही फेरबदल न करता त्यामध्ये ७१ कामांसाठी र.रू.२,८२,६९,०००/- चे वाढ व घट करून प्रपत्राप्रमाणे प्रत्येक लेखाशिर्ष व काम निहाय तरतूदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४७६ विषय क्रमांक :- ४
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - स्थापत्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/२२०/०९ दि.२१/०८/२००९.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१८ अन्वये, पिंपरीनगर वॉर्ड क्र.६९ मध्ये ठिकठिकाणी इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४६,६२,०२७/- [र.रू. शेहचाळीस लाख बासष्ठ हजार सत्तावीस] पेक्षा ५.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४७७ विषय क्रमांक :- ५
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - विद्युत ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९४३/०९ दि.२१/८/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५८ रावेतमधील डी.वाय.पाटील कॉलेज ते सष्टी फार्म पर्यंत नवीन झालेल्या दुभाजकात दिवे बसविणे या कामाकरिता प्राप्त दरधारकांपैकी लघुत्तम दरधारक मे.ऋषिकेश एन्टरप्रायझेस यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय र.रू. ५०,०००/- [र.रू.पन्नास हजार] पेक्षा ४.६ % कमी दराने करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४७८ विषय क्रमांक :- ६
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/९२/०९दि.२१/८/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१३/२००८-०९ मधील अ.क्र.२५ अन्वये, वॉर्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती येथिल भोपते वस्ती मधिल जुने संडास ब्लॉक पाडून व्यायामशाळा बांधणेकामी मे.एल.एम.तुलसानी (नि.र.रू.१२,५५,८००/- [र.रू.बारा लाख पंचावन्न हजार आठशे] पेक्षा ५.५० % जास्त) (सन २००८-०९ चे सुधारित दर सुचीशी तुलना करता ०.३० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम

करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४७९ विषय क्रमांक :- ७
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.एएमसी/बप्र/कावि/५१४/०९दि.२६/८/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-१० अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.३५ चा काही भाग व प्रभाग क्र२९ संपुर्ण मनपा भवन मोरवाडी मासुळकर कॉलनी येथील घरोघरचा कचरा नियोजित वेळापत्रक व रूट चॉर्ट प्रमाणे गोळा करणे व गोळा केलेला कचरा मोशी डेपो येथे खाली करणेकामी मे.डी.एस.कुलकर्णी (प्रति दिनी र.रू.२,४००/-) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रू.६,००,०००/- [र.रू.सहा लाख])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९४८० विषय क्रमांक :- ८
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - क्रिडा
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-१)मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/ग्रा/कावि/२७३/०९ दि.२०/७/०९
२)मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.६

महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर सन २००९-१० करिता र.रु.५०,००,०००/- तरतुद करण्यात आलेली असल्याने या तरतुदीमधुन सन २००९-१० या आर्थिक वर्षात प्रपत्र “अ” प्रमाणे महापौर चषक क्रिडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी अंदाजे येणारे र.रु.१४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :-९४८१ विषय क्रमांक :- ९
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - क्रिडा
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-१) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/३९०/०९ दि.११/८/०९
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.७

मनपाचे पिंपळे गुरव व्यायामशाळेतील कुस्ती हौदातील मातीत टाकणेकामी तेल,लिंबु,काउ, हळद व दही इत्यादी पदार्थ बाजारभाव प्रमाणे थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२१,८३०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच बोपखेल वॉर्ड क्र.१०५ मधील पिं.चिं.मनपाचे व्यायामशाळेत सदरचे संस्थेकडून त्यांचे दरानुसार काउमाती साहित्य पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८२ विषय क्रमांक :- १०
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-१)मा.बाबु नायर,मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१०

प्रस्तावासोबतचे प्रपत्र “अ” प्रमाणे ३१ व्यायाम शाळांकरीता व्यायाम साहित्य खरेदी करणेकामी निविदा काढून जरुर तो प्रस्ताव सभेपुढे ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८३ विषय क्रमांक :- ११
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-१) मा.बाबु नायर, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१२
विषय :- व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८४ विषय क्रमांक :- १२
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-१) मा.विजया जाधव, मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१३
विषय :- व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८५ विषय क्रमांक :- १३
दिनांक - २७.१०.२००९ विभाग-पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काशा/१/कावि/५६२/०९दि.२७/८/०९
विषय :- मनपाचे पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाचे वापराकरीता दोन जेटींग यंत्रणा व दोन नग जेटींग कम सक्शन यंत्रणा खरेदीबाबत...

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८६ विषय क्रमांक :- १४
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - वायसीएमएच
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक-मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/ ८अ/कावि/९०८/०९ दि.२०/०८/२००९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

श्री.राजू करूणाकरन यांचा कामाचा अनुभव लक्षात घेता श्री.राजू करूणाकरन यांना रुजू दिनांकापासून दि.८/११/२००९ या कालावधीकरता दरमहा एकत्रित र.रू. ६,०००/- [र.रू.सहा हजार] मानधनावर प्रोस्थेटिस्ट कम ऑर्थेटिस्ट या पदावर हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८७ विषय क्रमांक :- १५
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/२३९/०९दि.३१/८/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१३/२००८-०९ मधील अ.क्र.५ अन्वये, विकासनगर येथे शिंदे पेट्रोल पंप ते देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दी पर्यंतचा मुख्य रस्ता हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू. ४४,६८,६२५/- [र.रू.चव्वेचाळीस लाख अडुसष्ठ हजार सहाशे पंचवीस] पेक्षा ५.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८८ विषय क्रमांक :- १६
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - स्थापत्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३६३/०९ दि.३१/०८/२००९
विषय :- निविदा नोटीस क्र.स्थापत्य २९/९४ २००७ - ०८ मधील कामाचे करारनामे करणेबाबत...

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४८९ विषय क्रमांक :- १७
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - वायसीएमएच
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/८अ/कावि/९१३/०९ दि.२९/०८/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.श्रीम.दिपाली भांगे-डि.जी.ओ. यांना स्त्रीरोग तज्ञ व प्रसुती शास्त्रतज्ञ या पदाकरिता व डॉ.शल्मित वैद्य-एम.एस. जनरल सर्जरी यांना सर्जन या पदावर प्रस्तावात नमुद दरमहा एकत्रित मानधनावर तसेच कालावधीकरता हंगामी नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९० विषय क्रमांक :- १८
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - विद्युत
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९६०/०९ दि.२८/०८/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई बंगलोर हायवे जवळ पुनावळे व ताथवडे हद्दीत नविन जकात नाक्यासाठी बसविण्यात येणाऱ्या फायबर केबीन मध्ये विद्युत विषयक कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झाली असून मे.क्वॉलिटी इले.एंटरप्रायजेस यांचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४.६ % कमी असून सदरचे काम हे तातडीचे असलेने त्यांचेकडुन करारनामा करून कोटेशन पध्दतीने करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. [र.रू.५०,०००/-]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९१ विषय क्रमांक :- १९
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - आरोग्य मुख्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/६/कावि/४२२/०९ दि.१७/०९/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पवनानदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्राप्त झालेल्या दरांपैकी मे.एच.सी.लुंकड यांचे दर पोकलन प्रती तास २२००/- व डंपर प्रति दिन र.रु.३०००/- कमी दर असुन मनपा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने सदर दर स्विकारणेस व करारनामा न करता थेट पद्धतीने मे.एच.सी. लुंकड यांचेकडून दि.२०/७/०९ ते २४/७/०९ या कालावधीत काम करुन घेतलेने त्याकामी सेवाकरासह अंदाजे र.रु.१,५५,५२३/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९२ विषय क्रमांक :- २०
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/६/कावि/२५८/०९ दि.२९/०९/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी सन २००९ - १० साठी आवश्यक जंतुनाशके, किटकनाशके खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रकात प्राप्त लघुत्तम दरांच्या [१) ई नि.सु.क्र.८/२/०९-१० र.रु.८,१०,०००/- २)ई.नि.सु.क्र. ८/३/०९ - १० र.रु.५,६९,२५०/- ३) ई.नि.सु.क्र.८/४/०९-१० र.रु.४,७६,०००/- ४) ई.नि.सु.क्र.८/५/०९-१० र.रु.९,१३,७२०/-५)ई.नि.सु.क्र.८/६/०९-१० र.रु.६,२१,०००/- ६)ई.नि.सु.क्र. ८/७/०९-१० र.रु.६,८३,४००/- ७) ई.नि.सु.क्र.८/८/०९-१० र.रु.८,२२,५००/- ८) ई.नि.सु.क्र ८/९/०९-१० र.रु.४,४५,२००/-] अनुषंगाने करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले असल्याने सदर करारनाम्यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९३ विषय क्रमांक :- २१
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मध्यवर्ती औषध भांडार
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. मऔभां/१/कावि/२०३/०९ दि. ५/१०/२००९
विषय :- औषधे खरेदीसाठी आवश्यक खर्चास मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९४ विषय क्रमांक :- २२
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - प्रशासन
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/५३९/०९
दि. ८/१०/२००९
विषय :- श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ - कचराकुली यांना सेवेतुन काढुन टाकणेबाबत..
विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९५ विषय क्रमांक :- २३
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/नि/कावि/३६६/०९दि.१४/१०/०९
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००८-२००९ मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभागांतर्गत जुने नादुरुस्त खांबांची दुरुस्ती करुन पुर्नउभारणी करणेकामी मे.दिग्विजय इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.४,६३,८२९/- [र.रू.चार लाख त्रैसष्ठ हजार आठशे एकोणतीस] पेक्षा ४१.५१% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९६ विषय क्रमांक :- २४
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र. अप्र/कावि/ ३ /५८३/०९ दि. १५/१०/२००९
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.७ अन्वये, तळवडे गावठाणामधील नियोजित स्मशान भूमीजवळ स्वच्छतागृह बांधणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.एम.जी.खाडे (नि.र.रू.४,६२,१८४/- [र.रू.चार लाख बासष्ठ हजार एकशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १९.७७% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९७ विषय क्रमांक :- २५
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र. अप्र/नि/कावि/५८५/०९ दि.१५/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.४ अन्वये, तळवडे गावठाण रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४,६२,१८४/- [र.रू.चार लाख बासष्ठ हजार एकशे चौऱ्याऐंशी] पेक्षा ९.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९८ विषय क्रमांक :- २६
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र. अप्र/नि/कावि/ ५८७/०९ दि.१५/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.१९ अन्वये, वॉर्ड क्र.६ मोरे वस्तीमधील ताराबाई मोरे सोसायटीमध्ये रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४,६५,८८५/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार आठशे पंच्याऐंशी] पेक्षा ९.६०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९४९९ विषय क्रमांक :- २७
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - वायसीएमएच
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र. वि/वायसीएमएच/१९२/०९
दि. २०/१०/२००९

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील शस्त्रक्रिया कक्ष व इतर ठिकाणचे तातडीचे आवश्यक विद्युतीकरण कामकाज करणे या कामाची तातडीची गरज लक्षात घेता सर्वात कमी दर धारक एजंसी मे.भाग्यश्री एन्टरप्रायजेस, यांचेकडून रीतसर करारनामा करुन काम करणेस व त्याकामी येणाऱ्या ०.५% कमी दरानुसार र.रु.४९,७३५/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०० विषय क्रमांक :- २८
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/कावि/१०७१/०९ दि.९/१०/२००९

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड (केशवनगर शाळा) ते काळेवाडी पुलाजवळ उच्चदाब वाहिनी केबल टाकणेकामी विज पर्यवेक्षण शुल्क र.रु.२८,८५०/- म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०१ विषय क्रमांक :- २९
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मुख्य लेखा परिक्षण
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/९६४/०९ दि.२०/१०/२००९

मुख्य लेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०२ विषय क्रमांक :- ३०
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/ ३ /कावि/ ६५८/०९ दि.२१/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयातील प्रथमत: १०० विद्यार्थ्यांसाठी अॅबॅकस प्रशिक्षण सुरु करणेकामी १०० विद्यार्थ्यांचा खर्च X २२०० = र.रु.२,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित असला तरी सदर संस्थेने ५०% सवलत दिल्याने एकूण १०० विद्यार्थ्यांचा खर्च र.रु.१,१०,०००/- होत असल्याने सदर खर्च हा थेट पद्धतीने करारनामा न करता करणेस व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास व श्री.शारदा या संस्थेस कामकाज देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०३ विषय क्रमांक :- ३१
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - पाणीपुरवठा
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.पापु/कावि/८७/०९ दि.२२/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दापोडी येथे टँकर भरणेचे ठिकाणापर्यंत काँक्रीट रोड तयार करणे व पाण्याच्या टाक्यांखाली काँक्रीटींग करणेकामी अतिरिक्त बाब रक्कम रु.७८,७५८/- चे काम सदर निविदेअंतर्गत करुन घेतलेमुळे अंतिम बीलाची रक्कम अंदाजपत्रकीय खर्चाच्या कमाल मर्यादेपेक्षा (रु.३,९८,००२/-) रक्कम रु.९,८८३/-ने जास्त झाली असली तरी सदरचा खर्च मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असल्यामुळे सदरच्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०४ विषय क्रमांक :- ३२
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र. मुलेप/१/कावि/ १७४/०९ दि. २२/१०/२००९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.१०.२००९ ते दि.१८.१०.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७४/२००९ दि.२२.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०५ विषय क्रमांक :- ३३
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.मुख्यलेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१७३/०९ दि.२२/१०/२००९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.१०.२००९ ते दि.११.१०.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७३/२००९ दि.२२.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०६ विषय क्रमांक :- ३४
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९६१/०९ दि.२२/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभागाअंतर्गत रावेत हायवे नर्सरीजवळ स्ट्रीटलाईटसाठी विजपुरवठा करणेकामी बसविण्यात आलेल्या रोहीत्र संचाची (६३ KVA) दुरुस्ती रीवायडींग करणेचे काम तातडीचे असलेने मे.सिद्धीविनायक इंजि. सर्व्हीसेस यांचेकडुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १% कमी दराने करारनामा करुन कोटेशन पद्धतीने करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०७ विषय क्रमांक :- ३५
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - ब प्रभाग विद्युत
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९८१/०९ दि.२९/१०/२००९
विषय :- प्रभागाअंतर्गत तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक ३५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५०८ विषय क्रमांक :- ३६
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९८८/०९ दि.२२/१०/२००९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथील वीजसंच मांडणीस वीजपुरवठा करणारे स्विचगियर यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करणे या कामाची तातडीची गरज लक्षात घेता, सर्वात कमी दरधारक मे.भाग्यश्री इंटरप्रायजेस, यांचेकडून रीतसर करारनामा करुन काम करणेस व त्याकामी येणाऱ्या ०.५% कमी दरानुसार र.रु.४९,६८२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक :- ९५०९ विषय क्रमांक :- ३७
दिनांक - २७.१०.२००९ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/३०७/०९ दि.२६/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापौर कक्षासाठी चहा-कॉफी मेकर मशिन (डबल कप्पा) १ नग साहित्य खरेदीकामी मे.यूनिक सेल्स,पुणे यांचे चहा-कॉफी मेकर (डबल कप्पा) मशिन

साहित्याचे दर एकुण र.रु.१७,९२६/- स्विकृत करुन खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१० विषय क्रमांक :- ३८
दिनांक - २७.१०.२००९ विभाग-पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/७७४/०९ दि.२७/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

JNNURM प्रकल्पातील पाणीपुरवठा व जलनि:सारणाचे कामांची निविदा नोटीस क्र. JNNURM/PCMC/WS/१-०९-१०चे प्रसिद्धीसाठी जाहिरात खर्चापोटी दै.डी.एन.ए. यांना र.रु.५,६६,४००/- व दै.लोकसत्ता यांना र.रु.७,७४,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५११ विषय क्रमांक :- ३९
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा. गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

मानधनात वाढ करणेकामीचा परिपुर्ण स्वतंत्र प्रस्ताव सभेपुढे ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१२ विषय क्रमांक :- ४०
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे, मा.सुरेखा साळुंखे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडील इंग्रजी विषय शिकवणाऱ्या व इंग्रजी विषयाची आवड असणाऱ्या शिक्षकांना १ महिन्याचा इंग्लिश स्पिकींग कोर्स करणेसाठी प्रत्येकी १,०००/- याप्रमाणे एकूण २५,०००/- च्या खर्चास व ३ प्रशिक्षण कोर्सच्या (एका प्रशिक्षण वर्गात २५ शिक्षक प्रमाणे) खर्चास थेट पद्धतीने व करारनामा न करता श्री.संतोष पिंगळे यांना कामकाज देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१३ विषय क्रमांक :- ४१
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे, मा.सुरेखा साळुंखे यांचा प्रस्ताव...

विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा सु.क्र.१२/४-२००७/२००८ अन्वये क प्रभाग मनपा भवन कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात अडथळा करणारे धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरिता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब विजवाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन उच्चदाब व लघुदाब तारा हलविणे र.रु.१२,०८,४८,२१३/- कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सन २००९-१० चे अंदाजपत्रकात पानांक ४९३ अ.क्र.९ वर प्रस्तुतचे कामासाठी र.रु.१,६०,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली होती. सदर कामासाठी र.रु.१,५९,९९,३४९/- खर्च झाले असुन सदर कामावर सध्या तरतुद उपलब्ध नाही. सदर कामाची बिलांची रक्कम अदा करणे आवश्यक असल्याने क प्रभागाचे रस्त्यात अडथळा येणारे उच्चदाब/लघुदाब पोल व तारा हलविणे या लेखाशिर्षावरील खाली नमुद केलेल्या कामांवर खर्च होणार नसल्याने त्या कामांच्या तरतुदीमधुन पान क्र.४९३ अ.क्र.९ चे कामासाठी तरतुद वर्ग करणे शक्य आहे.

| अ.क्र. | पान क्र. | पानांवरील अ.क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | ४९२ | ४ | ७,३१,५६९/- |
| २ | ४९२ | ५ | ३,००,०००/- |
| ३ | ४९३ | १२,१३ | ४३,४७,०००/- |
| ४ | ४९५ | २३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३८ | ५५,००,०००/- |
| ५ | ४९६ | ४१ | १,००,०००/- |
| | | एकूण | १,०९,७८,५६९/- |

सबब वर नमुद केलेल्या कामाचे अंदाजपत्रकिय रक्कम रु. १,०९,५०,०००/-, निविदा क्र. १२/४-२००७/०८, कामाचे नाव - क प्रभाग मनपा भवन कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात अडथळा करणारे धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरिता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब विजवाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन उच्चदाब व लघुदाब तारा हलविणे या कामासाठी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१४ विषय क्रमांक :- ४२
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. जकात/१/कावि/१५०५/०९
दि.२६/१०/२००९.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

जकात विभागाचे कामाचे स्वरुप विचारात घेता व पुन्हा निविदा काढुन होणारा विलंब, नविन कर्मचाऱ्यांना काम शिकण्यास लागणारा वेळ,सध्याच्या चालु असलेल्या कामात पडणारा खंड इ. बाबींचा विचार करता, जकात विभागाचे मागणीनुसार पदवीधर व संगणक M.S.Office ज्ञान अवगत असलेले कर्मचारी पुन्हा निविदा न काढता मुदतवाढ देणेकामी मागील वर्षाचे ठेकेदार मे.दिलीप विठ्ठल नाणेकर,पिंपरी यांना ११ महिन्यांकरीता १५ कर्मचारी पुरविणेबाबत करारनामा करुन काम देणेस व किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कामगार कल्याण अधिकारी कळवतील त्या किमान वेतन दराने वेतन अदा करणेकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली आहे. त्यास त्यामध्ये प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार कर्मचाऱ्यांच्या नावे पगार पिं.चिं.म.न.पा.ने चेकद्वारे करणेची दुरुस्ती करुन त्यासह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१५ विषय क्रमांक :- ४३
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रशांत शितोळे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५५ मधिल आकुर्डी रेल्वे स्टेशन लगतच्या दोन्ही बाजुचे उद्यानातील जॉगिंग ट्रॅक व उद्यान देखभालीसाठी मे.स्फुर्ती बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांना ५ वर्षे कालावधीसाठी योग्य त्या दराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१६ विषय क्रमांक :- ४४
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.राजेश पिल्ले,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

सन २००९-२०१० अंदाजपत्रकामध्ये स्थापत्य विभागाकडील खालीलप्रमाणे वाढ/घट करुन तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | पान क्र. /अक्र. | सन ०९-१० ची तरतूद | वाढ तरतूद | घट तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२७ संत तुकाराम नगर येथील बॅडमिंटन हॉल | १५३/९ | १२८०००० | २५००००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | परीसरातील फुटपाथ व पाथवेना पेव्हींग ब्लॉक बसविणे. | | | | |
| २ | नाला ट्रेनिंग | प्रभाग क्र.३२ संत तुकारामनगर येथील स्वरगंगा सोसा.मागील नाला बांधणे व दुरुस्त करणे. | १२४/१६ | १५३४००० | २५००००० | |
| ३ | नाला ट्रेनिंग | प्रभाग क्र.३२ संत तुकारामनगर येथील सुखवानी बिल्टकॉम सोसा.मागील नाला बांधणे व दुरुस्त करणे. | १२४/१७ | १५३४००० | २५००००० | |
| ४ | इमारत व सांस्कृतिक केंद्र | संत तुकारामनगर येथील मोकळ्या जागेचे सपाटीकरण करुन विरंगुळा केंद्र बांधणे. | १७४/१ | १०००००० | २५००००० | |
| ५ | स्थापत्य विशेष योजना | बिजलीनगर येथे गिरीराज हौ.सोसायटी येथे रेल्वे पादचारी पुल बांधणे. | १५/१(६) | ५३८५००० | | ५०००००० |
| ६ | स्थापत्य विशेष योजना | भोसरी येथे उड्डाणपुल बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे, | १७/४(४) | २६०५५०००० | | ५०००००० |
| | | | एकूण | २७१२८३००० | १०००००००० | १०००००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५१७ विषय क्रमांक :- ४५

दिनांक - २७.१०.२००९

सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले

संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

मे.अजित स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या. या संस्थेस मनपाचे तानाजीनगर येथील सावित्रिबाई फुले उद्यान,तानाजी गावडे व्यायामशाळेजवळील आनंदीबाई डोके उद्यान व गणेशबाग उद्यान देखभालीचे सध्याचेच कामास प्रतिमहा र.रु.१२,६४८/- (र.रु. बारा हजार सहाशे अठ्ठेचाळीस) या दराने सध्याचे कामाची मुदत संपल्यापासून पुढील ५ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५१८ विषय क्रमांक :- ४६

दिनांक - २७.१०.२००९

सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे

संदर्भ:-मा.राजेश पिल्ले,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्वाईन फ्लू या आजाराची दि.३/८/०९ पासून सुरुवात झाली. या आजाराचा प्रसार झपाट्याने वाढत गेला त्यामध्ये या आजारात एकूण ४७ रुग्ण मृत्यू पावलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण शहरात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. या आजारावर वैद्यकीय उपचारासाठी रुग्णांचे संख्येत दिवसेनदिवस आजअखेर पर्यंत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

याकरिता वैद्यकीय विभागामार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांचा तुटवडा भासत असल्याने शासनाने १६ वैद्यकीय अधिकारी यांचे पथक म.न.पा.कडे या आजाराच्या उपचारासाठी पाठविण्यात आले. महानगरपालिकेने या वैद्यकीय अधिकाऱ्यांना म.न.पा.च्या वेगवेगळ्या रुग्णालयात व दवाखान्यात नियुक्ती देणेत आली. या वैद्यकीय अधिकाऱ्यांना म.न.पा.च्या वतीने राहण्यासाठी,जेवण,नाष्टा,चहा साठी खर्च करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी या १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेंट्रल इन्स्टीटयूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, सी.आय.आर.टी., भोसरी, पुणे-३९ येथे व्यवस्था करणेत आली. असिस्टंट सुप्रिटंड,सी.आय.आर.टी. यांनी दि.२८/८/०९ पत्रान्वये या १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना राहण्यासाठी,चहा,नाष्टा,जेवण इ.साठी सेंट्रल इन्स्टीटयूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांचेकडील बिल क्र.९३३२ दि.४/९/२००९ चे पत्रान्वये ८३,२५५/- इ. खर्च असल्याने सदरचे खर्चाचे बील अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५१९ विषय क्रमांक :- ४७
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

जनविकास स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेस क प्रभागात व महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांचा कामाचा पुर्वानुभव विचारात घेता व मनपाचे आर्थिक हित विचारात घेता पुढील तीन वर्षे कालावधीकरीता मुदतवाढ देवुन मनपाचे ब व ड प्रभागात कीटकनाशक फवारणी करणेकामी किमान वेतन दराने स्वयंसेवक उपलब्ध करुन घेऊन त्यांचेकडून फवारणी करुन घेणेस व त्याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५२० विषय क्रमांक :- ४८
दिनांक - २७.१०.२००९
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.राजेश पिल्ले,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

शिवराजमुद्रा प्रतिष्ठाण,भोसरी यांस कै.पै.धोंडीबा उर्फ गणपत फुगे क्रीडा मैदान,परीसर व हॉल देखभाल, संरक्षणाकामी दि.४/९/०९ पासून पुढील वीस वर्षे कालावधीकरीता द.म.र.रु.३५,०००/- सेवाशुल्क तत्वावर (प्रतीवर्षी १०% वाढीच्या अटीवर) मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५२१
विषय क्रमांक :- ४९
दिनांक - २७.१०.२००९
विभाग - विद्युत क प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार
अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/वि/कावि/८१०/०९ दि.२६/१०/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी जलतरण तलाव येथील फिल्ट्रेशन प्लॉन्ट दुरुस्तीचे काम मे.श्रीधर एन्टरप्रायजेस यांच्याकडून पुर्ण करण्यात आले असल्याने यापोटी आलेल्या र.रु.२,२०,६६५/- (अक्षरी र.रु.दोन लाख विस हजार सहाशे पासष्ठ फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९८१/२००९
दिनांक - २९/१०/२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.